# कोल्हापूर महानगरपालिका

## सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे नवीन अंदाजपत्रक

**निवेदन :**

मा.सभापती महोदय, स्थायी समितीचे सर्व सन्मानीय सदस्य,

कोल्हापूर महानगरपालिकेचे सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे नवीन अर्थसंकल्पीय अंदाज महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सादर करण्यात येत आहेत.

कोल्हापूर महानगरपालिकेचे सन २०१७-१८ चे अर्थसंकल्पीय अंदाजात अव्वल शिल्लकेसह **महसूली व भांडवली** जमा रक्कम रुपये ५१९,७५,३६,०९६/- अपेक्षित असून अपेक्षित खर्च रुपये ५१९,४८,०९,०००/- वजा जाता रक्कम रुपये २७,२७,०९६/- इतकी शिल्लक अपेक्षीत आहे. तसेच **विशेष प्रकल्पा** अंतर्गत सुरु असले कामांचे जमा खर्चाचे स्वतंत्र अंदाज सोबत सादर केले असून त्यामध्ये जमा रुपये ४८५,२०,६६,७४१/- अपेक्षित असून खर्च रुपये ४७५,७१,७०,७२३/- अपेक्षित आहे. महिला व बालकल्याण निधी व केंद्रीय वित्त आयोगाचे एकत्रित स्वतंत्र पत्रक अंदाजपत्रकामध्ये दर्शविण्यात आले आहे. वित्त आयोगाअंतर्गत एकूण जमा रु. ४२,७९,३२,४२३/- अपेक्षित असून खर्च रु. ३९,९५,००,०००/- अपेक्षित आहे.

याप्रमाणे **महसुली, भांडवली व विशेष प्रकल्प, वित्त आयोग मिळून एकुण रु.** १०४७,७५,३५,२६०/- इतके जमेचे अर्थसंकल्पीय अंदाज सादर करण्यात येत आहे. महानगरपालिकेमध्ये सुरु असलेले केंद्र/राज्य शासन निधीमधील विविध प्रकल्प व नव्याने मंजूर झालेले प्रकल्प यासाठी महानगरपालिका स्वनिधीमधून मोठया प्रमाणावर मनपा हिश्श्याची रक्कम उपलब्ध करुन द्यावी लागत आहे, याचा प्राधान्याने विचार करुन सन २०१७-१८ चे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यात आलेले आहेत.

### सन २०१६-१७ चे अर्थसंकल्पामधील ठळक अंमलबजावणी -

- **सेफ सीटी प्रकल्प अंमलबजावणी -**

कोल्हापूर महानगरपालिकेकडून कोल्हापूर सेफसीटी रु.७.५० कोटीचा प्रकल्प मनपा व डिपीडीसी निधीमधून कार्यान्वीत करण्यात आला आहे. आता सेफसीटी टप्पा २ चा प्रकल्प प्रस्तावीत असून यामध्ये व्हीडीओ सर्व्हीलन्स सिस्टम, इमर्जन्सी व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टीम, पब्लिक ॲड्रेस सिस्टीम, पोलीस एम-बीट सिस्टीम, ट्रॅफिक एम-चलन सिस्टीम, व्हिझीटर इन्फॉरमेशन मॅनेजमेंट सिस्टीम, डायल- १०० प्रकल्प राबविणे, सी.टी. ऑपरेशनस् डॅश बोर्ड इत्यादींचा समावेश आहे.

- **हागणदारी मुक्त शहर (ओपन डेफिकेशन फ्रि सीटी) -**

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान उपक्रमाअंतर्गत राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविणेत आले आहे. कोल्हापूर महानगरपालिकेस हागणदारीमुक्त झालेबाबत राष्ट्रीय स्तरावरील

स्कॉच ऑफ मेरीट ॲवॉर्ड मिळाले आहे. केंद्र शासनाने कोल्हापूर हागणदारीमुक्त शहर म्हणून घोषित केले आहे.

- **पाणी आकारणी स्पॉट बिलींग व कलेक्शन -**

पाणी पुरवठा बिलींग सिस्टीममध्ये पारदर्शकता येण्यासाठी कनेक्शनधारकास जागेवरच बिल देणेसाठी स्पॉट बिलींग यंत्रणा यशस्वीरित्या राबविण्यात आली आहे. यासाठी मागील एक वर्षापासून पाणी पुरवठाचे ॲन्ड्रॉईड मोबाईलव्दारे स्पॉट बिलींग करण्यात येत असून सदर यंत्रणा कार्यान्वीत करण्यात आली आहे. यामुळे आर्थिक बाबींमध्ये गतीमानता येऊन उत्पन्नामध्येही वाढ झालेली आहे.

- **ई ऑफीस यंत्रणा कार्यान्वीत** -

महानगरपालिकेच्या कामकाजात संगणकाचा अधिकाअधिक वापर करुन त्यायोगे सर्व कामकाज पेपरलेस करण्याचे महानगरपालिकेचे धोरण आहे. यास्तव महानगरपालिकेचे प्रशासन गतीमान व्हावे, कामकाजात सुसूत्रीपणा यावा, दस्तऐवजाची सुरक्षितता आणि माहिती जलदगतीने प्राप्त होऊन निर्णय प्रक्रिया सुलभ व जलद व्हावी यासाठी महानगरपालिका प्रशासनाने एनआयसीच्या ई- ऑफीस प्रणालीची अंमलबजावणी केलेली आहे. सध्या ई-ऑफीस प्रणालीव्दारे मनपाचे कामकाज सुरु आहे.

**<u>सन २०१७-१८ चे अर्थसंकल्पामधील ठळक प्रकल्प</u>** -

- **अमृत अभियान अंतर्गत मलनिस्सारण प्रकल्प** -
  - केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानअंतर्गत राज्य वाषिक कृती आराखडयामध्ये कोल्हापूर शहराच्या मलनिस्सारण प्रकल्प रु.७२.४७ कोटी मंजूर करण्यात आला आहे. सदर प्रकल्पामध्ये केद ५० टक्के रु.३६.२३ कोटी, राज्य २५ टक्के रु.१८.५२ कोटी व कोमनपा २५ टक्के रु.१८.५२ कोटी हिस्सा आहे. सदर योजना मंजूर झाली आहे. सदर योजनेमध्ये पुढील कामे समाविष्ठ आहेत.
    - दुधाळी नाला झोनमध्ये ११२.९० कि.मी. ड्रेनेज लाईन टाकणे.
    - दुधाळी नाला येथे ६ द.ल.लि. क्षमतेचा मलशुद्धीकरण प्रक्रिया प्रकल्प बांधणे व इतर अनुषंगीक कामे करणे.
    - कसबा बावडा येथे ४ द.ल.लि. क्षमतेचा मलशुद्धीकरण प्रक्रिया प्रकल्प बांधणे.
    - कसबा बावडा नाला अडविणे, वळविणे व इतर अनुषंगीक कामे
    - जुना बुधवार, सी.पी.आर., राजहंस, रमणमळा, ड्रीमवर्ड, लक्षतीर्थ, विटभट्टी इ. नाले व रंकाळा तलावानजीक सरनाईक व देशमुख इ. नाले यांचेवर फायटोरिड पध्दतीचे सांडपाणी प्रक्रीया प्रकल्प बांधणे.

  सध्या सदर कामाची रु.७२.४७ कोटीची निविदा प्रसिध्द करण्यात आली असून अंदाजपत्रकीय वर्षामध्ये काम पूर्ण करण्याचा मानस आहे.

- **प्रधानमंत्री आवास योजना -**

शहरातील सर्व झोपडपट्ट्यांचे सर्वेक्षण या योजनेअंतर्गत पूर्ण करुन सर्वांसाठी घरे कृती आराखडा व वार्षिक अंमलबजावणी आराखडा शासनाच्या मान्यतेसाठी म्हाडाकडे सादर केला आहे. सदर योजनेमध्ये झोपडपट्ट्यांचा आहे तेथेच पुर्नविकास करणे व खाजगी भागीदारद्वारे परवडणाऱ्या घरांची निर्मिती करणे यांचा समावेश आहे. या अंतर्गत कदमवाडी, बोंद्रेनगर, सुभाषनगर, संभाजीनगर कामगार चार येथे प्रकल्प प्रस्तावीत आहेत.

- **केंद्र/राज्य अनुदान प्रकल्प अंमलबजावणी -**

**काळम्मावाडी थेट पाईपलाईन** योजनेचे काम अर्थसंकल्पीय वर्षामध्ये पूर्ण करणेचा मानस आहे. शासनाच्या विविध विभागांच्या प्रलंबित परवानग्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

**युआयडीएसएसएमटी भुयारी गटर** योजनेमधील उर्वरीत रु.११ कोटीचे कामासाठी निधी उपलब्ध करण्यात आला आहे, सदर कामे अंदाजपत्रकीय वर्षामध्ये पूर्ण करुन घेण्यात येत आहेत.

**तिर्थक्षेत्र विकास प्रकल्प** अंतर्गत महालक्ष्मी मंदिर व परिसर विकास आराखडा अंमलबजावणीसाठी प्रयत्नशील आहोत. सदर योजनेमधून मोठा निधी उपलब्ध करणेत येऊन पर्यटक/भाविक यांना आवश्यक व मुलभुत सुविधा प्राप्त होणार आहे.

**नगरोत्थान योजना अंतर्गत दुधाळी एसटीपी** १७ एमएलडी एसटीपीचे प्रत्यक्ष काम सुरु झालेले आहे. सन २०१७-१८ चे अंदाजपत्रकीय वर्षामध्ये सदर एसटीपी पूर्ण क्षमतेने कार्यान्वीत करण्यात येत आहे.

- **घरफाळा मिळकतींचे जीआयएस सर्वेक्षण -**

शहरातील सर्व मिळकतींना घरफाळा लागू करणेसाठी अत्याधुनिक जीआयएस तंत्रज्ञान वापरुन मिळकतींचा संपूर्ण सर्व्हेचे कामकाज सुरु करण्यात आले आहे. जीआयएसच्या माध्यमातून सर्व्हेक्षण करणेत येत आहे. आतापर्यन्त जवळपास १५ हजार मिळकतींचे सर्व्हेक्षण पूर्ण झाले आले आहे. अंदाजपत्रकीय वर्षामध्ये उर्वरीत सर्व सर्व्हेक्षण पूर्ण करण्यात येत आहे.

- **घनकचरा व्यवस्थापन -**

  **विकेंद्रीत घनकचरा प्रक्रीया केंद्रे** - विघटनशील ओल्या कचऱ्यावर प्रक्रीया करणेसाठी विकेंद्रीत स्वरूपात ५ टन क्षमतेचे २ बायोगॅस प्लॅन्ट पूर्ण होत आले आहेत. संकलित केलेल्या कचऱ्यापैकी प्रक्रीयायोग्य विघटनशील कचऱ्यावर प्रक्रीया करणेसाठी स्थानिक ऑरगॅनिक वेस्ट कॉम्पोस्टर (ओ.डब्लू.सी.) मशिन मैलखडडा येथे कार्यान्वित करणेत आलेले आहे.

  - **स्वच्छ भारत अभियानअंतर्गत शौचालय उभारणी** - केंद्र शासनाचे स्वच्छ भारत अभियान (नागरी) तसेच राज्य शासनाचे स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत कोल्हापूर महानगरपालिकेने शहरातील वैयक्तिक शौचालये उपलब्ध नसणारे कुंटुंबांचे सर्व्हेक्षण करून

वैयक्तिक शौचालय बांधणेकामी प्रतिलाभार्थी रू. १५०००/- इतके अनुदान १३७७ पात्र लाभार्थ्यांना देणेत आले आहे.

- **स्वच्छ भारत अंतर्गत विशेष निधी** - केंद्र शासनाचे विशेष निधितून एकुण लोकसंख्येच्या आधारे (५,४९,२८३) करीता प्रतिव्यक्ति रू. १२००/- याप्रमाणे एकुण रू. ६५.९२ कोटी इतका निधी घनकचरा करीता नियोजित आहे. याकामी शासनाकडून कोल्हापूर महानगरपालिकेचा घनकचरा व्यवस्थापनाचा विकास आराखडा (डिपीआर) तयार करणेकामी मे. टाटा कन्सलटन्सी इंजिनिअरींग, मुंबई या संस्थेची निवड करणेत आली आहे. सदर सल्लागार संस्थेकडून डीपीआर तयार करुन घेणेत येत आहे व सदर प्रकल्पाची अंमलबजावणी करणेत येत आहे.
- **उद्याने विकास व नागरी वनीकरण** - शासनाचे अमृत योजनेअंतर्गत नागरी वनीकरणाचा रु.१ कोटीचा प्रकल्प अंमलबजावणी ठेवण्यात येत आहे. नव्याने उद्यानांचा विकास करणे, शहरामध्ये नव्याने झाडे लावणे व नागरी वनीकरण वित्त आयोग व मनपा स्वनिधी यामधून रु. १ कोटीची नव्याने तरतूद करण्यात आलेली आहे.

- **ई गर्व्हनन्स स्मार्ट सुविधा -**

ई-ऑफीस यंत्रणा, घरफाळा जीआयएस, फेस रेकग्नीशन सिस्टीम, कॅशलेस पेमेंटसाठी ऑनलाईन पेमेंट सुविधा, ऑनलाईन कंम्प्लेंट सिस्टीम इ.सुविधा ई- गर्व्हनन्स माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच महानगरपालिका मोबाईल ॲप, रेकॉर्ड डिजीटायझेशन या योजना राबविणेत येत आहेत.

**रोड मॅनेजटमेंट सिस्टीम –** शहरातील रस्तेंची सध्यस्थिती, सर्व रस्तेंची लांबी,रुंदी, देखभाल दुरुस्तीसाठी करावा लागणारा खर्च, नव्याने करावे लागणारे रस्ते याविषयी अचूक माहिती मिळावी यासाठी जीआयएस तंत्रज्ञान व लिडार टेक्नॉलॉजीचा वापर रोड मॅनेजमेंट सिस्टीम विकसीत करण्यात येत आहे. शहराच्या सर्व रस्तेंचा सर्व्हे करणे व डाटा कलेक्शन करणेबाबत रोड मॅनेजमेंट सिस्टीम विकसीत करणेबाबत निविदा प्रक्रीया प्रस्तावीत आहे. यामधून संपूर्ण माहिती उपलब्ध होणार आहे. दिर्घकालीन योजनांसाठी सदर डेटाचा वापर करता येणार आहे.

- **अग्निशमन सेवसाठी टर्न टेबल लॅडर -**

शहरातील उंच इमारतींसाठी टर्न टेबल लॅडर ही अत्याधुनिक वाहन यंत्रणा खरेदी करणेबाबत प्रस्तावीत आहे. उंच इमारतीमध्ये कोणत्याही पध्दतीची आपत्कालीन स्थिती उद्‌भवल्यास अशा वेळी आपत्ती व्यवस्थापन करणे, लोकांची सोडवणूक करणे, शोध व बचाव कार्य करणे, परिस्थिती नियंत्रणात आणणे इ.महत्वाच्या कामांसाठी टर्न टेबल लॅडर घेणेत येत आहे. यासाठी भरीव आर्थिक तरतूद वित्त आयोग/मनपा निधीमधून करण्यात आलेली आहे.

- **वाहतूक नियंत्रण व पार्किंग** -

शहर वाहतूक नियत्रण शाखा याचेशी समन्वय साधून थमोप्लॅस्टीक पटटे, पार्कीग पटटे, झेबा कॉसींग पट्टे, सेंटर लाईन थमोप्लॅस्टीक पटटे मारणे, वाहतुक शिस्तसाठी दिशा दर्शक, सुचना दर्शक, माहिती दर्शक फलक बसविणे, स्पीड बेकर बसविणे. मुख्य रस्तेंचे रोड डिव्हायडर बसविणे इ.कामांसाठी बजेटमध्ये तरतूद करण्यात आली आहे. तसेच शहरातील एकूण १२ सिग्नलचे सिंकोनाझेशन करणेत येणार आहे. यासाठी रु २५ लक्ष बजेटमध्ये तरतुद करणेत आली आहे. यामध्ये पुढील ठिकाणी १२ ठिकाणीचे सिग्नलचे सिंकोनाझेशन होणार आहे.

- **महिला बालकल्याण / अपंग कल्याण कार्यक्रम व मागास निधी तरतूद :**

शासन निर्णयानुसार  व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनुसार महिला व बालकल्याण कार्यक्रमासाठी निव्वळ उत्पन्नाच्या ५ टक्के, अपंग कल्याण कार्यक्रम ३ टक्के व मागास निधी ५ टक्के निधी आरक्षीत करण्यात आला आहे. यामधून शासन मार्गदर्शक सूचना व योजनांसाठी खर्च करावा लागणार आहे.

प्रस्तावीत अर्थसंकल्पाबाबत **नागरिकांकडून वेगवेगळया माध्यमातून अपेक्षा** व्यक्त करण्यात आल्या आहेत. यामध्ये महिलांसाठी स्वच्छता गृहे,पर्यटकांसाठी पार्किंग,हेरिटेज वास्तुंचे जतन, स्मशान गॅस दाहिनी,मोबाईल ॲप,ऑनलाईन पेमेंट, कचरा विल्हेवाट,सांडपाणी छोटे प्रकल्प,बचत गटांसाठी योजना,पर्यावरण विषयक बाबी इत्यादी यासाठी भरीव विविध लेखाशिर्षा अंतर्गत  तरतूद केली आहे. नागरिकांनी व्यक्त केलेल्या अपेक्षा जास्तीत जास्त पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

मनपा प्रशासनामध्ये अधिक गतिमानता येण्यासाठी संगणकाचा जास्तीत जास्त वापर करण्यात येत आहे. कालानुरुप मनपाचा आस्थापना आकृतीबंध व सेवा प्रवेश नियम यामध्येही बदल प्रस्तावीत आहेत.

महानगरपालिका आयुक्त म्हणून कामकाज पाहताना सर्व पदाधिकारी, सर्व मनपा सदस्य, नागरीक, माझे सहकारी अधिकारी, कर्मचारी यांचे कायम सहकार्य लाभले आहे, यासाठी मी सर्वांचे मनःपुर्वक आभार मानतो.  महानगरपालिकेकडून राबविणेत येत असलेले सर्व प्रकल्प व नागरिकांना देण्यात येत असलेल्या सर्व सेवा-सुविधांची यांची पूर्ण क्षमतेने अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न आहे. सन २०१६-१७ चा सुधारीत व सन २०१७-१८ चा नवीन अर्थसंकल्प राबविताना आम्हास असेच सहकार्य लाभेल अशी अपेक्षा आहे.

सन २०१६-१७ चे सुधारीत व सन २०१७-१८ चे नवीन अर्थसंकल्पीय अंदाज मा.स्थायी समितीस सादर करीत आहे, तरी सदरचे अंदाज स्वीकारुन मा.स्थायी समितीने अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करावे अशी विनंती करणेत येत आहे.

**( पी शिवशंकर )**

कोल्हापूर.　　　　　　　　　　　　आयुक्त,आयएएस

दिनांक :  २२ मार्च २०१७　　　　　　　　कोल्हापूर महानगरपालिका.

----------------